
खरं प्रेम
- अविनाश अशोक जामदार...

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# खरं प्रेम

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

**आमचं काहीच कमी होत नाही.**

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि **तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही तुमचे आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते ईसाहित्यला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# खरं प्रेम

लेखक

अविनाश अशोक जामदार

# खरं प्रेम

लेखक... अविनाश अशोक जामदार

Mobile No. 9322309122
पत्ता-कराड(सातारा)
पिन कोड-415114
Email-infojamdar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान



www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604



**प्रकाशन : १ नोव्हेंबर २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे

मी अविनाश अशोक जामदार.



तुमच्यासारखाच सामान्य माणूस. अस सांगण्यासारखे आयुष्यात काहीच मोठे झाले नाही; कदाचित हे पुस्तक ही त्याची पहिली पायरी असेल,.

'खरं प्रेम' च्या निमित्ताने…

तशी वाचनाची आवड लहानपणापासून म्हणजे शाळेच्या दिवसापासून होती. खूप सारी पुस्तके वाचली. त्यातील काहींची नावे घेऊ इच्छितो. 5 point someone, श्यामची आई, 3 Mistakes of my life आणि सर्वात आवडते पुस्तक म्हणजे श्रीमदभगवतगीता ज्यामध्ये श्रीकृष्णाने भरपूर ज्ञान व सफल होण्याचे मार्ग सांगितले आहेत.

पुस्तकाच्या बाबतीत काही…

आज-काल प्रेम म्हणजे खेळ झालाय. कोण खर आणि मनापासून करेना झालय, सर्वजण टाईम पास म्हणून करतात. मग ती मुलगी असो वा मुलगा. ह्या पुस्तकात तुम्ही खरे प्रेम कसे असते हे पाहाल किंवा अनुभवाल आणि एक वेळ अशी येईल की तुम्हाला ही रडू फुटेल, हे माझे पहिले पुस्तक असल्यामुळे काही चूक झाल्यास समजून घ्या.

'खरं प्रेम' चे कव्हर पेज माझ्या मोठ्या बहिणीने म्हणजेच पायल थोरात ताईने बनवले, त्याबद्दल तिचे मनापासून आभार. मला अगदी

लहानपणापासूनच पुस्तक लिहायचे होते, पण पुरेशी माहिती नव्हती; जेव्हा कळले की, ई- साहित्य प्रतिष्ठान हे नवख्या लेखकांना त्यांचे विचार मांडण्याची संधी देते. त्यांनी मलाही माझे विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार आणि पूर्वा राऊत ताईनेही खूप मदत केली त्याबद्दल तिचेही आभार. हे पुस्तक लिहिताना मला मदत केलेल्या सर्व मित्रांचे मनापासून आभार. त्यातील एका मित्राने माझा आत्मविश्वास वाढवला आणि मला हे पुस्तक लिहिताना खूप मदत केली, त्याबद्दल त्याचेही मी आभार मानतो. विशेष बाब म्हणजे या कथेच्या नायकाचे नावही त्याच्या नावावरून घेतले आहे.

-अविनाश अशोक जामदार

'खरं प्रेम' ही कथा काल्पनिक आहे. त्यातील व्यक्ती, स्थळ, प्रसंग हे सर्व काल्पनिक असून वास्तविक कोणत्या व्यक्तीशी किंवा स्थळाशी त्याचे साम्य आढळून आल्यास तो निवळ योगायोग समजावा.


खरं प्रेम

# अपघात

तशी ती मॉडर्नच… पण घरच्यांपुढे एकदम साधी, अगदी भिजलेल्या मांजरासारखी! दिसायला खूपच सुंदर, काळ्याभोर दाट केसांची, कोणालाही भुरळ पडेल अशी होती ती. नाव तिचे दिशा. आईबाबांची एकुलती एक लेक होती ती, तसे आईबाबा तिला स्वतःच्या जिवापेक्षा जास्त जपायचे… अगदी तळ हाताच्या फोडाप्रमाणे! तिला खूप शिकवावे आणि आपल्या पायांवर उभे करावे, अशी बाबांची खूप इच्छा; पण दिशाला हिंडण्याचा खूपच नाद. आपलेही पंख असावेत, आपणही हवेत तरंगावे, जगाचा कोना नि कोना बघावा, असे दिशाला वाटे. वर्ल्ड ट्रॅव्हलर व्हायचे स्वप्न होते तिचे; पण घरच्या गरीबीमुळे ते स्वप्नच राहिले.

आई किचन-कट्ट्यावर भांडी घासता घासता दिशाला म्हणाली. "ए दिशु आज करणार आहेस ना ॲडमिशन". आई लाडाने दिशाला दिशु म्हणायची

"हो, पण माझी मुळीच इच्छा नाही पुढे शिकण्याची. "दिशा म्हणाली

"अग पण बाबा म्हणाले ना कर ॲडमिशन त्या Fsc ला"तिच्याकडे बघत आई म्हणाली.

"आई ते MSc असत, FSc नव्हे. " दिशा हसत म्हणाली.

“ठेवा नाव मला, तुझी आई जास्त शिकली नाही पण दुनियादारीचे खूप धडे घेतलेत तिने हे विसरू नकोस” आईने दिशाला चांगलेच खडसावले.

“हो आई मला माहित आहे”हे बोलून दिशाने आईला मिठी मारली.

तेवढ्यात दिशाचे बाबा म्हणजे मनोहर माने तिथे आले आणि म्हणाले, “ओ होम मिनिस्टर, झाला का नाही अजून माझा डबा. मला उशीर होतोय कामाला जायला. ”

“हो झाला ना…आज तुमच्या आवडीची टोमॅटोची भाजी केलीय आणि एक सांगतेय कालच्यागत जर डबा मागे आणला तर माझ्याशी गाठ आहे” आईने बाबांना दिशासमोर ताकीद दिली.

“नाही ग आणत बाई, भर लवकर”बाबा आपले आवरत म्हणाले.

“दिशा तू आज ॲडमिशन करायला जाणार आहेस ना”बाबा दिशाकडे बघत म्हणाले.

“हो बाबा जाणार आहे”दिशा घाबरत म्हणाली कारण ती तिच्या बाबांना खूप घाबरायची पण त्यापेक्षाही जास्त प्रेम करायची.

“मी पैसे देईन पण अभ्यास करायचा; नाहीतर तुझं लग्न लावून देईन”बाबा दिशाची चेष्टा करत म्हणाले

“बाबा तुम्हाला पहिले आणि शेवटचे सांगतेय, मी तुम्हाला सोडून कोठेही जाणार नाही”. दिशा बाबांना धमकी देत म्हणाली आणि सगळेजण हसायला लागले.

बाबा आईकडे बघत म्हणाले, “बायको मागच्या आठवड्यात तुला मी माझा पगार दिलेला आठवतोय का! ”

“हो ते मी कसे विसरीन” आईने आपली बाजू सावरून घेतली.

त्यातील दिशूला हवे तेवढे पैसे दे, मी जातो कामाला. "

“देते, तुम्ही नीट जा. ”

पैसे मोजत आई दिशाला म्हणाली, “हे धर बाळ पैसे, ॲडमिशन झाल्यावर कॉल कर आणि जरा अभ्यासावर लक्ष दे. आम्हाला तुझ्याकडून खूप अपेक्षा आहेत. ”

“हो आई मला माहित आहे तु आणि बाबांनी माझ्यासाठी खूप केलंय ते, मी तुमच्या अपेक्षा कधीही भंग होऊ देणार नाही” दिशाने आईला समजुतीच्या स्वरात सांगितले.

दिशा कॉलेजच्या गेटपर्यंत पोहोचली पण तिच्या मनात अजून आईचाच विचार चालू होता. आपली गरीब परिस्थिती, बाबांचे स्वप्न, आपली स्वप्ने ह्याच विचारात ती इकडे-तिकडे न बघता रस्ता क्रॉस करायला गेली. समोरून एक गाडी हॉर्न मारत आली; पण दिशाला त्या हॉर्नचा आवाज काय ऐकू आला नाही…दुचाकी चालवणाऱ्याने प्रसंगावधान म्हणून करकचून ब्रेक दाबला तरीही गाडी दिशाला येऊन

धडकली आणि दिशा खाली रस्त्यावर पडली, बघता-बघता तिथे गर्दी झाली. गर्दीतील मंडळी त्या मुलाला शिव्या देऊ लागले; पण कोणीही उठण्यासाठी दिशाला मदत केली नाही. शेवटी दुचाकीस्वारानेच दिशाला उठवले…

“सॉरी, तुम्हाला लागले तर नाही ना.. ”, तो दुचाकीस्वार घाबरत दिशाला म्हणाला.

“नाही लागलं एवढं, नुसतं खरचटलय गुढघ्याला. ”गुढघ्याला हात लावत दिशा म्हणाली.

बघता बघता तिथली गर्दी कमी झाली व दिशाही तिथून निघून गेली.

दिशाचा ॲडमिशनच्या मुलींच्या रांगेत पाचवा नंबर होता आणि मुलांच्या बाजूला कोणीच नव्हते.

10 मिनिटांनी दिशाचा नंबर आला, तिने आपले कागदपत्र व फीज बॅगेमधून काढले व काउंटरपाशी दिले. नकळत दिशाची नजर मुलांच्या रांगेकडे गेली तर तिथे तिला दोन मुले दिसले, त्यातील दुसरा मुलगा सकाळी झालेल्या अपघातातील दुचाकी चालवणारा होता, त्याला बघून दिशाने लगेचच आपली नजर दुसरीकडे फिरवली

दिशा ॲडमिशन झाल्यावर बाहेर गेली; तेवढ्यात तिला मागून हाक ऐकू आली, “ओ लेडी…”तो मुलगा दिशाकडे येत म्हणाला.

“काय आहे??” दिशा घाबरट आवाजात म्हणाली

“सॉरी, तुम्हाला लागले नाही ना सकाळी, ”तो दिशाकडे बघत म्हणाला

“नाही लागले; पण माझीच चूक होती, मी रस्ता क्रॉस करताना पाहिले नाही इकडे-तिकडे. आय अँम सॉरी”

“मी तुम्हाला तू म्हणले तर चालेल ना…आणि तुम्ही पण मला तू म्हणत जा”

“हो चालेल, बर जाउ का मी आता”, दिशा खाली मान घालत म्हणाली

“Ok, तु आता ऍडमिशन घेतलंस ना, कशाला घेतलंस??”

“हो, MSc in chem मध्ये”दिशा कमी आवाजात म्हणाली

“खरच FY ला”

“हो, तू का असा विचारत आहेस??”दिशा अजून खालीच मान घालून बोलत होती

“मीपण M. Sc. in chem लाच आहे; पण सेकंड इयरला, तुला काय अडचण आली तर सांग मला, आणि महत्वाचे म्हणजे; इथे कडक सेक्युरीटी असल्यामुळे रॅगिंग वगैरे काही होत नाही, त्यामुळे रिलॅक्स रहा. ”

“हो, सांगते अडचण आल्यावर, बर मी जाते”

दिशा तिथून निघून गेली…दिशा गेल्यावर तो मनात म्हणाला, काय सुंदर आहे रे ही मुलगी आपल्याला खूप आवडली.

## 15दिवसानंतर..

“आई आज माझ्या कॉलेजचा पहिला दिवस आहे तर, लवकर डबा कर, मी बाबांबरोबर जाणार आहे.” दिशा आपले आवरत म्हणाली

“हो झालंय जेवण, भरते आता डबा, तू पहिल्यांदा देवाच्या पाया पड. ”आई डबा भरता भरता म्हणाली.

तेवढ्यात बाबा तिथे आले आणि म्हणाले..

“शुभ सकाळ”, आज कॉलजचा पहिला दिवस आहे ना दिशा…मग झाली की नाही तयारी!

“हो झाली बाबा, जाऊया ना आपण सोबत”

“हो जाऊया, होम मिनिस्टर झाला का डबा??”

आई हॉलमध्ये आली आणि म्हणाली…

“हा धरा तुमचा डबा आणि हा धर ग दिशा तुझा डबा”

दोघेही नाष्टा करून घराबाहेर पडले.

दिशाच्या ओळखीचे त्या कॉलेजमध्ये कोणीच नव्हते??, तेवढा तो अँक्सिडेंटवाला मुलगा सोडला तर.

अजून फर्स्ट लेक्चरला एक तास बाकी होता म्हणून दिशा लायब्ररी मध्ये अभ्यास करायला गेली, तर तिथे तिला भली मोठीशी लाईन दिसली.

“कशासाठी लागले ग ही लाईन??”दिशाने तेथील शेवटच्या मुलीला विचारले

“ओळखपत्र घेण्यासाठी लागले रांग”ती मुलगी म्हणाली

"थँक्यू" बोलून दिशाही लाइनमध्ये उभी राहिली

“ओळखपत्र घेतल्यावर ऑफिसमध्ये जाऊन उपप्राचार्य यांची सही त्यावर घ्यायची”, दिशाच्या पुढची मुलगी दिशाला म्हणाली

दिशा ऑफिसमध्ये सही करायला गेली; तेव्हा नकळत तिचे ध्यान कॅशिअरपाशी गेले. तिथे एक वृद्ध थकलेला माणूस आणि त्याबरोबर एक मुलगा मोठयाने काहीतरी त्या कॅशिअरला सांगत होते

तेवढ्यात तेथील वृद्ध माणसाचा रडलेला आवाज दिशाच्या कानावर पडला, आणि तो वृद्ध माणूस म्हणाला…

“साहेब करा ना माझ्या मुलाचे ऍडमिशन, आम्ही खूप गरीब आहोत”, वृद्ध माणसाने आपले डोळे पुसले

“ओ काका आज कॉलेजचा पहिला दिवस आहे तुम्ही आज आला आहात, ऍडमिशनची शेवटची दिवस संपून 15 दिवस झाले, मी आता नाही करू शकत ऍडमिशन”

तेवढ्यात तिथे कॉलेजचे प्राचार्य आले

“एवढा का दंगा करताय??”, प्राचार्य कॅशरकडे बघत म्हणाले

“अहो सर हे काका आज आलेत ऍडमिशन करायला”, कॅशिअर नम्रतेने म्हणाला

“सर आमची परिस्थिती खूप गरीब आहे, कृपा करून माझ्या मुलाचे ऍडमिशन करा”, ते वृद्ध काका रडव्या सुरात बोलले

“अहो बाबा नका रडु तुम्ही, राहूदे ऍडमिशन करायचं! ”तिथे असणारा मुलगा आपल्या बाबांचे डोळे पुसत म्हणाला

प्राचार्य कॅशरला म्हणाले, “तेवढे करा ह्यांच्या मुलाचे ऍडमिशन”

कॅशिअर म्हणाला“, हो सर करतो, काका द्याइकडे कागदपत्र आणि फीज”

वृद्ध काकांनी बॅगेतील पैसे काढले व कॅशिअरला दिले.

“धन्यवाद सर, तुमचे आभार कसे मानू कळेना झालंय”, वृद्ध काकांनी हात जोडले

“असुदे”, हे म्हणून प्राचार्य तिथून निघून गेले.

इकडे दिशाचा नंबर आला, तिने सही घेतली व ऑफिसच्या बाहेर गेली.

मुलगा आणि त्याचे वडील ऍडमिशन करून ऑफिसच्या बाहेर पडले

“राहुल तुझा क्लास आहे ना 11 वाजता”.

“हो बाबा, तुम्ही पण जा आता घरी आणि आईला सांगा की ॲडमिशन झाले म्हणून. ”

राहुलचे बाबा तिथून निघून गेले

दिशाच्या मनात विचार येतो की आपण त्या मुलाबर बोलूया का! दिशा राहुलपाशी गेली आणि त्याला म्हणाली, “ते मगाशी तुझे बाबा रडत का होते??, मला नीट ऐकू आल नाही; पण वाईट वाटले त्यांना रडताना बघून, म्हणून तुला विचारायला आलेय. ”

“आमची परिस्थिती खुप वाईट आहे, बाबांनी माझे ॲडमिशन कारायला त्यांची सोन्याची चैन गहाण ठेवलीय, मला खूप शिकायचंय आणि खूप मोठं व्हायचय; आणि तुला एक सांगू का.. ?”

“हो सांग ना.. ”

“माझ्याबर तुझ्या अगोदर कोणतीच मुलगी बोलली नाही, मी गरीब असल्यामुळे”

“त्यात गरिबीचा संबंध काय??”

“कारण मी चांगली कपडे घालू शकत नाही, चांगली hair style करू शकत नाही आणि माझा चेहरा पण इतका चांगला नाही की कोणी माझ्यावर इंप्रेस होऊ शकेल”.

“तुझे नाव काय आहे??”

“राहुल जाधव, तुझे??”

“माझे दिशा माने, बर मी जाते मला उशीर होतोय लेक्टरला जायला”

“पण तू कशाला आहेस??”राहुल म्हणाला

“मी MSc in chem ला, अन तू??”

“हो का मीपण MSc in chem लाच आहे”

“चल आपण जाऊया सोबत लेक्चरला”,

ते तिथून जाणार तेवढ्यात तिथे त्यादिवशी अॅक्सिडेंट वाला मुलगा आला आणि म्हणाला“हाय लेडी”

“तू मला असं लेडी म्हणत जाऊ नको, खूपच विचित्र वाटत”

“मग तुझं नाव काय आहे??”

“दिशा मी जातो, तू ये मागून”, राहुल म्हणाला आणि लेक्चरला गेला.

“दिशा, हा कोण ग भिकारी??”तो मुलगा राहुल गेल्यानंतर दिशाला म्हणाला

“माईंड युअर लँग्वेज, नीट बोल माझा मित्र आहे तो”, दिशा रागात म्हणाली

“सॉरी, असला गरीब मित्र आणि तुझा! ”

“नसू शकतो का??”

“हो असू शकतो. जाऊ दे, मी ओमकार”

“माझे नाव तुला कळलेच असेल”

“दिशा बरोबर”

“चल मी जाते माझे लेक्चर आहे, उशीरच झाला मला”

“हो जा पण काही अडचण आल्यास मला कॉल कर, हा धर माझा नंबर 91######75”

“बर मी जाते. ”

रात्री जेवताना तिला सारखा तो कॉलेज मध्ये घडलेला किस्सा आठवायचा, राहुलचे बाबा रडलेले आणि तो ओमकार राहुलला भिकारी म्हणलेला, तिचे जेवणावर काहीच लक्ष्य नव्हते.

मग बाबाच म्हणाले, “दिशु कसा गेला कॉलेजचा पहिला दिवस??”

“हो बाबा चांगला गेला”

“ओळख केलीस की नाही कोणाबर??”

“हो बाबा एक मैत्रीण झाली रुपाली नावाची. ”

ती मुद्दामच राहुल आणि ओमकारची नावे सांगत नाही

जेवण झाल्यानंतर ती झोपायला तिच्या रूम मध्ये गेली पण तिला काय झोप लागली नाही. काही वेळाने ती झोपी गेली

दुसऱ्यादिवशी सकाळी दिशा म्हणाली, ”आई बाबा जाते मी कॉलेजला”

“अग डबा तरी घेऊन जा”, आई आपले काम आवरत दिशाला म्हणाली

“नको मी खाईन कॉलेजच्या कॅन्टीन मध्ये”, बर बाय

“हो चालेल, नीट जा ग बाळा”बाबा म्हणाले

दिशा कॉलेजला गेली.

Analytic chemistry चे पहिले लेक्टर होते, मॅडम आत आल्या आणि फळयावर तारीख आणि विषयाचं नाव लिहिलं, तेवढ्यात दिशा आली आणि म्हणाली, “May I coming mam”

“Yes, coming इतका लेट कसा झाला! , लेक्टर चालू होऊन 10 मिनिटे झालेत, पुन्हा जर लेट झाला तर नंतर घेणार नाही मी माझ्या लेक्टरला”

“मॅम सॉरी ", दिशा घाबरत म्हणाली

“बर तुला एक प्रश्न विचारते बेसीकचा, What is Analytic chemistry?”

दिशाला काय सुचल नाही! ती खाली मान घालुन उभी राहिली

मॅडम रागात म्हणाल्या, “तुला एवढा सोपा प्रश्न येत नाही! ”

मॅडमने दिशाचे ओळखपत्र बघितले व त्यावरील नाव जोराने घेतले, “दिशा मनोहर माने, काय सुंदर नाव आहे मॅडमच! नाऊ गेट आऊट”, मॅडम रागात म्हणाल्या

“मॅम सॉरी, मी परत नाही उशीर करत”, दिशा रडलेल्या आवाजात बोलली

“गेट आऊट, एकदा बोललेलं ऐकू येत नाही का! बाहेर चल वर्गाच्या”

दिशा खाली मान घालून क्लासच्या बाहेर गेली.

“कोणाला येतंय का क्लास मध्ये उत्तर, what is analytic chemistry??, ” मॅडम पूर्ण वर्गात नजर फिरवून बोलल्या

त्यातील पहिल्या बेंचवर बसलेला सिद्धार्थ म्हणाला, “मॅडम मला येतंय, मी सांगू का??”

“हो सांग, ”

“Analytic chemistry is…”, सिद्धार्थ हळू आवाजात म्हणाला

“सकाळी काय नाष्टा करून आला नाहीस होय, जरा जोरात बोल की पूर्ण क्लास ला ऐकू जाईल असे”

वर्गातील सर्वजण हसायला लागले.

सिद्धार्थ चाचपडत म्हणाला, “Analytic chemistry is studies and uses instruments and methods use to separate”

“Very good बस खाली", मॅडम शाबसकीच्या सुरात म्हणाल्या

दिशा आपली खाली विचार करत बसलेली होती, नकळत तिचे घड्याळाकडे लक्ष्य गेले तर घड्याळात 2 वाजलेले होते आणि सूर्यही पश्चिमेकडे गेलेला होता.

ती दचकन उठली व स्वतःलाच म्हणाली, “अया 2 वाजले, कसा वेळ गेला कळलेच नाही, भूक पण लागली आहे खूप; जाऊया कॅन्टीनमध्ये काहीतरी खाऊया, आणि जाऊया घरी, राहूदे आज राहिलेली लेक्टर करायची आणि हो त्या खडूस मॅडमच लेक्टर नाही करायचं उद्यापासून; मग नापास झाले तरी चालेल तिच्या विषयात”

कॅन्टीनमध्ये गेल्यावर तिला कोणाचीतरी हाक ऐकू आली.

“हाय दिशा”

दिशाने इकडे-तिकडे बघितले तर तिला एका खुर्चीवर ओमकार बसलेला दिसला. ती त्याच्याजवळ गेली आणि म्हणाली “Hi, लेक्टरला गेला नाही तुम्ही”

“आम्ही लेक्टर अटेंड नाही करत, लेक्टरला फक्त 10 जण असतात ती पण न्यूटनची मुले”, ओमकार हसत हसत म्हणाला

त्याचे मित्र पण त्याच्या या फालतू जोकवर हसले.

“दिशा हे बघ माझे मित्र, तुझी ओळख करून देतो, हा अविनाश, हा आनिकेत, अनिकेतला सर्वजण मोठ्या नावाने हाक मारतात, ह्याचे वय मोठे आहे म्हणून नाहीतर ह्याची साईझ मोठी आहे म्हणून”

परत तेथील सर्वजण हसायला लागले.

“आणि ही माझी GF अनिता”

“ऐ ओमकार नीट बोल, मी तुझी नुसती फ्रेंड आहे GF नाही, परत जर असे बोललास तर तुला दाखवतेच”, अनिता हसत म्हणाली

अनिता सोडून ओमकारला कोणीच उलटे बोलत नव्हते; कारण ओमकारच ह्यांचा सर्व खर्च बघत होता, ओमकारच्या घरची परिस्थिती चांगली होती.

“Hi अविनाश, Hi अनिकेत, Hi अनिता”, दिशा हात पुढे करत बोलली

“ही त्यादिवशीची आहे ना ओमकार”, अविनाशने उत्सुकतेने विचारले

“कोणत्या रे??”, अविनाश बोललेलं ओमकारला काही कळले नाही म्हणून तो म्हणाला

“अरे तीच ना अॅक्सिडेंट वाली”

“हो तीच आहे ही दिशा”

“दिशा ए ना आमच्या गॅंग मध्ये शामिल हो”अविनाश दिशाकडे बघत म्हणाला

दिशा त्यांच्यात येऊन बसली.

लगेच ओमकारने प्रत्येकाला पाहिजे ती ऑर्डर केले व खाऊन झाल्यानंतर बिल ही त्यानेच दिले.

शेवटी दिशा बोलली, ”बर बाय फ्रेंड्स मी जाते”

“बस ना अजून थोडा वेळ, इतकी काय गडबड आ??हे”ओमकार म्हणाला

“नाही नको जाते, भेटू उद्या”

“हो जा पण माझा नंबर आहे ना तुझ्याकडे”ओमकार म्हणाला

“आहे केला की काल सेव”

“तुझा नंबर दे ना! ”ओमकार म्हणाला

“तुला करेन मी घरी गेल्यानंतर कॉल”

“आता कर ना! ”

“नको आता”

“का?”ओमकार जरा आवाज चढवूनच बोलला

“बर ठीक आहे बाबा, हा बघ केला कॉल”

“सेव करतो तुझा नंबर, guys तुम्हाला पाहिजे का नंबर! ”

सर्वांनी संमती दर्शवली.

“मी तुम्हाला पाठवतो व्हाट्स अँपला”ओमकार अविनाशच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला

“बाय”हे बोलून दिशा तिथून निघून गेली

“बाय, ए उद्या कॉलेजवर”ओमकार दिशा कॅन्टीनबाहेर गेली तरी तिच्याकडेच बघत राहिला

“ही तुला आवडायला लागली की काय??”, अविनाश दिशा गेल्यानंतर हळूच ओमकारला म्हणाला

“आवडली तर नाही पण खूप सुंदर आहे, मज्जा लेणे का भाई ज्युनिअर के साथ”, ओमकार हसत म्हणाला.

“अरे मग तू तिला जाना घरी सोडायला”, अविनाश चहाचा घोट घेत म्हणाला

“हे तर माझ्या डोक्यातच नाही आले, guys मी जातो”

जाताना ओमकार जोरात म्हणाला ‘Mission दिशाला पटवणे’

“दिशा थांब, चल मी तुला घरी सोडतो ”ओमकार रुमालाने घाम पुसत म्हणाला

“नको रे जाते माझी मी, तुला कशाला माझ्यामुळे त्रास”

“त्यात त्रास कसला, चल मी तुला सोडतो; पण तूझे घर कोठे आहे??”

“लांब नाही, इथेच आहे, पण नको जाईन माझी मी”

“येतेय का तुला उचलून गाडीवर बसवू, ”ओमकार आपला चेष्टेत म्हणाला

“बर ठीक आहे येते मी तुझ्याबर”

दिशा गाडीवर बसली पण ती इतकी कम्फर्टेबल न्हवती.

“चल मी तुला सांगते कोठे जायचे ते??”

दिशा रात्री ओमकारचाच विचार करत बसलेली होती, तिच्या मनात आता ओमकारबद्दल काहीतरी वाटत होते; पण हे तिचे तिला माहीत न्हवते की हे प्रेम आहे की आकर्षण…

तेवढ्यात ओमकार चा व्हाट्स अँपला मेसेज आला, ”जेवला का MS. World”

दिशाने टाईप केले, ”मी कोणी MS. World नाहीये! ”

“हो चुकले माझे, तुम्ही तर MS. Universe आहात”

“ओंकार बस झाली चेष्टा, माझे झाले जेवण, तुझे झाले का??”

“नाही रात्री 12 ला करणार आहे”ओमकारने ह्याबरोबर हसण्याची इमोजी पाठवली

“तुला शेवटचं सांगतेय; आता जर चेष्टा केली तर तुला डायरेक्ट ब्लॉक करीन समजलं”दिशाने ह्याबरोबर रागाची इमोजी पाठवली

“बर सॉरी, कसा गेला तुझा कॉलेजचा दुसरा दिवस??”

“Boring, त्या Analytic chemistry च्या मॅम किती खडूस आहेत रे 3 idiots मधल्या वायरससारख्या”

“अग आम्ही पण त्या गायकवाड मॅडमला वायरसच म्हणतो”ओमकारला माहीत होते की हे खरे नाही पण तो असच दिशाला इम्प्रेस करायला म्हणाला

“हो का! मी आता कधीच नाही करणार त्या वायरसच लेक्टर”

“नको करू पण कितवे असते मॅडमचे लेक्टर??”

“अरे पहिलंच, त्यांचे सहाच्या सहा दिवस पहिलेच lecture असते”

“बर मग ये उद्या कॉलेजवर आपण कुठे तरी जाऊ जवळच फिरायला??”

“अरे पण मी गरीब आहे. असं दररोज फिरणं, खाणं मला नाही परवडणार”

“तेरा ऐ दोस्त हे तो फिकर किसकी करनेकी”ओंकारने ह्याबर किंग ची इमोजी पाठवली

“बर बाय गुड night, झोपते आता”

“Ok By gn”

कॉलेजवर सकाळी सगळे पोहोचलेले; तेवढी दिशा अजून आलेली नव्हती

“कॉल कर की दिशाला, कुठे आहे बघ??”अनिकेत ओमकारला म्हणाला

“तूला का हवी आहे दिशा आणि दिशाकडे जास्त बघायचे नाही ती माझी GF आहे”ओमकार जरा लाजतच म्हणाला

“हॅलो दिशा, कुठे आहे आम्ही तुझी वाट बघतोय य लवकर??”

पुढून आवाज आला, ”अरे आलेय जवळच थांब 10 मिनिटे, मी येते. ”

“बर य”ओमकारने फोन ठेवला

दिशानेही फोन ठेवला; तेवढ्यात तिला राहुल दिसला व ती रिक्षाचालकाला म्हणाली, ”काका थांबा इथेच”

“अग पण अजून कॉलेज आले नाही! ”रिक्षाचालक आरशातून दिशाकडे बघत म्हणाला

“हो मला माहित आहे; पण मी जाते इथून चालत”

“हे धरा तुमचे पैसे”

“राहुल”दिशाने जोरात हाक मारली

“बोल ना दिशा”राहुल मागे बघत दिशाला म्हणाला

राहुलचा चेहरा घामाने ओला झालेला होता, त्याचा तो जुना शर्ट, त्या शर्टाचा तर पुर्ण कलरच गेलेला होता.

तिच्या मनात विचार आला की; आपण PG ला आहोत, सर्व मुले किती style मारतात आणि हा असा कसा…

“तू चालत का येत होतास, मी तुला पाहिले रिक्षामधून”

“अग, मी दररोज चालतच येतो, इथे जवळच आमचे घर आहे आणि रिक्षाने याला माझ्याकडे पैसे नसतात एवढे”

दिशाच्या मनात विचार आला की, त्यादिवशी तर हा म्हणत होता की; बाबांनी चैन गहाण ठेऊन ॲडमिशन केलय आणि ह्यांच्याकडे रिक्षाने याला पैसे नाहीत आणि चैन घ्यायला कुठून आले पैसे??

“राहुल तुला एक विचारू का??”

“हो, विचार ना”राहुलने खिश्यातील रुमाल काढला आणि घाम पुसत म्हणाला

“राग मानून घेऊ नकोस”

“अग मला राग नाही येत, कालच तुझे अन त्या मुलाचे संभाषण मी ऐकलेलं, तो म्हणाला ना; हा कसला तुझा भिकारी मित्र, पण तू म्हणलेले मला भारी वाटले”राहुल हसत म्हणाला. “हो विचार ना तुला काय विचारायचं ते”

“तुम्ही एवढे गरीब आहात तर तुमच्याकडे पैसे कुठून आले चैन घ्यायचे??”

“आम्ही पहिल्यापासून गरीब नव्हतो ग, माझे आजोबा मध्यमवर्गीय होते, पण त्यांच्या मृत्यूनंतर माझे बाबा आणि काकांमध्ये सारखी भांडणे व्हायची आणि माझा काका गुंड आहे, तो दररोज दारू पिऊन घरी यायचा आणि काकीला मारायचा. एकदा तर त्याने बाबांची जबरदस्तीने प्रॉपर्टीच्या कागदावर सही घेतली व आम्हाला घरातून बाहेर काढले. माझे बाबा खूप भोळे आहेत; म्हणून लोक त्यांचा फायदा घेतात. आता आईबाबांच्या फक्त माझ्याकडून अपेक्षा आहेत त्यामुळे मी खूप शिकणार आणि ती चैन माझ्या आजोबांनी बाबांना दिलेली”, राहुलच्या डोळयांत अश्रु आले

दिशालाही वाईट वाटले, इतक्यात कॉलेज आले

राहुल म्हणाला, ”मी जातो एकटा, तू जा एकटी”

“का??”, दिशा म्हणाली

“तुझा कालचा मित्र परत म्हणेल भिकाऱ्याबर आलीस”, राहुल हसत म्हणाला

“नाहीरे तस काही नाही, ओमकार चांगला मुलगा आहे”

तेवढ्यात तिला ओमकारचा कॉल आला, “दिशा अग ये ना पटकन, किती वेळ झाला??”

“हो आले कॉलेजच्या गेटपाशीच आहे”

“बर जाते मी राहुल भेटू पुन्हा”, दिशा फोन ठेवत म्हणाली

“Hi सुंदरी”, ओंकार हसतच म्हणाला

“ऐ गप हं काहीपण नको बोलू”, दिशा जरा रागातच बोलली

“बर सॉरी, कुठे जाऊया फिरायला??”

अनिकेत म्हणाला, “इथे जवळच एक रेस्टॉरंट आहे तिथे जाऊया आपण”

“नको नको आपण ice-cream पार्लर मध्ये जाऊया”, ओमकार अनिकेतच्या डोक्यात टपली मारत म्हणाला

सगळ्यांनी होकार दिला; कारण बिल तर ओमकारच भरणार होता ना!

“हे घ्या सगळयांनी ऑर्डर केलेले ice-cream”, ओमकार दिशापाशी येऊन म्हणाला

सर्वांचे खाऊन झाल्यावर ओमकार दिशाला म्हणाला, ”दिशा आवडले का तुला ice-cream??”

“हो खूप मस्त आहे, मला खूपच आवडले

अविनाश ओठावरील ice-cream पुसत म्हणाला, “आम्ही पण आहोत इथे, का फक्त दिशाच आहे! आम्ही जाऊका बाहेर, तुम्ही बसा गप्पा मारत. ”

“नाही रे तुम्ही तर जिगरी यार आहात, तुम्हाला कसे वाटले ice-cream??, दिशा आपल्या गॅंगची नवीन मेम्बर आहे; म्हणून तिला विचारले बाकी काही नाही”

“ओके guys मी जाते second lecture अटेंड करते”

“लेक्टर करून कोणाचे भले झालंय आणि जे लेक्टरला बसतात तेच फेल होतात, एवढं टेन्शन नको घेऊ, मी आहे ना…तुला टेन्शन घ्यायची काही गरज नाही”

दिशालाही ते पटले, ते इकडे-तिकडे फिरले, आजपण ओमकारनेच दिशाला घरी सोडले.

## 3 महिन्यानंतर….

“ओमकार, अरे चल अभ्यासाला जाऊया लायब्ररीमध्ये, फर्स्ट सेमला फक्त 2 आठवडेच बाकी आहेत”दिशा वडापावचा घास घेत म्हणाली

“अजून 2 आठवडे म्हणजे 14 दिवस आहेत चिल यार, इतना टेन्शन मत ले”

“पण अरे माझा काहीच अभ्यास झाला नाही आणि मी एक लेक्टरपण पूर्ण केलं नाही”, दिशा जरा चिंतेच्या भावात म्हणाली

“हे घे ice-cream आणि थंड रहा”.

आता ओमकार आणि दिशाच्या मैत्रीचे प्रेमात रूपांतर झालेले होते, दिशा त्याच्यावर मनापासून प्रेम करायची; पण ओंकार तिच्याकडे फक्त time pass म्हणूनच बघायचा, त्याच्या मनात प्रेम असे काहीच नव्हते.

“दिशा आवर लवकर आज पहिला पेपर आहे”, आई दिशाच्या रूममध्ये येत म्हणाली

दिशा अजूनही झोपलेलीच होती

“ऐ दिशु उठ ना”आई दिशाच्या अंगावरील अंथरून काढून म्हणाली

“उठते आई, किती वाजलेत??”

“9 वाजले 11 ला पेपर आहे ना! ”आई दिशा उठावी म्हणून खोट बोलली

“काय 9 वाजले! मला उठलं पाहिजे”, दिशा उठली आणि लगेचच बाथरूम मध्ये गेली.

“अग आई झाला का नाष्टा मला जाऊदे उशीर होतोय”

दिशाची नजर नकळत घड्याळाकडे गेली तर घड्याळात 9 वाजलेले होते. तिने आपले डोळे चोळले आणि परत बघते तरीही घड्याळात 9च वाजलेले.

“आई आताशी 9 वाजले, तू मला खोटे का बोललीस??”

“पहिला पेपर आहे ना आज, तू लवकर जायला पाहिजेस म्हणून खोट बोलली, बर ते जाऊदे हा कर नाष्टा आणि अभ्यास झाला तुझा! ”

“अग नाही आई काहीच झाला नाही, ओमकार मला म्हणालाय तुला important नोट्स देतो”

आईने दिशाला विचारले, “हा ओमकार कोण ग??”

“नाही आई तुला जसे वाटतंय तस काही नाही, ओमकार माझा मित्र आहे फक्त मित्र”दिशा आईशी खोट बोलली.

तेवढ्यात बाबा आले आणि दिशाला म्हणाले, ’’दिशु झाला का अभ्यास??, आज पहिला पेपर आहे ना! ”

“हो बाबा झालाय अभ्यास, आता निघालेच बघा कॉलेजला”

“जा आणि नीट पेपर लिह”,

“बाबा मला आशीर्वाद द्या”, दिशा बाबांच्या पाया पडत म्हणाली

“माझा आशीर्वाद तुझ्या सदैव पाठीशी आहे”, बाबा तिच्या डोक्यावर हात फिरवून म्हणाले.

आई म्हणाली, “माझ्या पाया नाही पडणार दिशु”

“आई मला आशीर्वाद दे की आजचा पेपर चांगला जाऊदेत”.

“हो बाळा मन लावून लिह”, आई दिशाच्या कपाळावरून हात फिरवत म्हणाली

दिशा कॉलेजला गेली.

“Hi दिशा ऑल द बेस्ट”, ओमकार हात पुढे करत म्हणाला

“थँक्स, पण जरा मला टेन्शनच आलंय”

“अग टेन्शन नको घेऊ यार, आपण आपले पेपर झाले ना की मग पार्टी करूया”

“हो नक्की करु”, दिशा घाबरट आवाजात म्हणाली

दिशाचे सर्व पेपर संपले, त्यातील दिशाला काही पेपर सोपे गेले तर काही पेपर खूपच अवघड गेले.

सांगितल्याप्रमाणे ओमकारची उद्या पार्टी होती

“हॅलो दिशा, काय करतेस??”

“काही नाही बघ आता निकाल आहे आठवड्यात, त्याचीच वाट बघतेय, आज खूप दिवसातून कॉल केलास”

“मी तुला म्हणाले होतो ना पेपरच्यावेळी की आपण पेपर झाल्यावर पार्टी करूया! ”

“हो आठवले”, दिशा आठवत म्हणाली

“मग त्या पार्टीची शॉपिंग करायला जाऊया का आज??, त्यासाठीच मी तुला फोन केलाय”

“कधी करणार आहेस पार्टीचे नियोजन??”

“उद्या”

“बर चालेल, किती वाजता जाऊया शॉपिंगला??”, दिशा म्हणाली

“आवर तु, एका तासात आपण जाऊ, मी तुला pickup करतो”

“बर चालेल”

एका तासांनंतर ओमकार दिशाच्या घरी गेला दिशाला pickup करायला.

“चल बस गाडीवर जाऊया आपण”ओमकार दिशाला म्हणाला

दिशाला आता ओमकारची सवय झालेली होती, तिने ओमकारच्या खांद्यावर हात टाकला व हसली

ओमकारही गाडीच्या आरशात दिशाला बघून हसला

ते दोघेजण शॉपिंग करायला मॉलमध्ये गेलेले होते.

त्यांची शॉपिंग पूर्ण झाल्यावर ते एका चांगल्या रेस्टॉरंटमध्ये खायला गेलेले.

“कशी चाललीय तयारी उद्याच्या पार्टीची?”, दिशाने सहजच विचारले

“हो झाली ना, आणि तुला मी एक surprise देणार आहे”

“काय देणार आहेस surprise?? ”, दिशाने उत्सुकतेने विचारले

“अग surprise आहे, उद्या कळेल तुला”

“मी खूप excited आहे तुझ्या surprise साठी”

“काय मागवू या खायला??”, ओमकार वेटरला बोलवत म्हणाला

“मागव काही ही”

दिशा दुसऱ्या दिवशी उठली, तिच्या डोक्यात एकच विचार चालू होता; की ओंकार मला आज काय surprise देणार??

तिने अनिताला कॉल केला

“काय चाललंय??”, दिशा म्हणाली

“काही नाही खूप दिवसातून कॉल केलास”समोरून आवाज आला

“तू पण करत जा ना कॉल कधीतरी, का मीच दरवेळी करू कॉल! , बर ते जाऊदे पार्टीला येणार आहेस ना आज! ”

“कोणती पार्टी??”, अनिता म्हणाली

“अग ओमकारची पार्टी आहे ना आज, तुला माहीत नाही होय”

“मी नाही बोलत ओमकारबर, I hate ओमकार”

“काग काय झाले तुमच्या दोघात??”, दिशाने विचारले

“तुला सांगू का! ”

“हो सांग ना! ”दिशा डोळे फिरवत म्हणाली

“ओमकार खूप मतलबी माणूस आहे, पहिला माझ्याबर दिवसातून 2 तास तरी फोनवर बोलायचा, पण आजकाल फोनच करत नाही आणि तू त्याच्या आयुष्यात आल्यापासून माझ्याबर धड बोलतही नाही, मग मी पण त्याच्याबर बोलत नाही”

“अग तो busy असेल म्हणून बोलत नसेल, तू येणा आजच्या पार्टीला! ”

“नाही नाय येणार आणि त्याने मला invitation पण दिले नाही, तुम्ही करा एन्जॉय”, अनिताने हे बोलून फोन ठेवला

दिशा सकाळपासूनच खूप खुश होती; कारण तिला ओढ लागली होती ओमकारच्या surpriseची

दुपारी ओमकारचा कॉल आला,

“Hi दिशा, मी तुला आज pickup करायला येतो आपण सोबतच जाऊया पार्टीला”

“नको, मी जाईन माझी मी, मला तेवढा पत्ता सेंड कर”

“माझ्याबर का नाही येत तू??”

“अरे, मलापण तुला surprise द्यायचे आहे! ”

“हो का, करतो सेंड पत्ता, बाय”

“बाय”दिशाने कॉल ठेवला

संध्याकाळी ओमकार लवकरच पार्टीच्या ठिकाणी पोहोचलेला, तो सगळी तयारी नीट झालेय का ते बघत होता.

तेवढ्यात दिशा आणि तिची रुपाली नावाची मैत्रीण तिथे आली, दिशाने गडद निळ्या रंगाचा गाऊन घातलेला होता. ती इतकी सुंदर दिसत होती की त्याचे वर्णन ही करता येणार नाही. ओमकार तिच्याकडे बघतच राहिला.

“ओमकार कशी दिसतेय मी??”, दिशाने सहजच विचारले

“ओह भाई मारो मुझे, पृथ्वी पे चांद उतर आया! ”

“इतकी पण भारी नाही मी”दिशा ओमकारला टफली मारत म्हणाली

“अग तू जर beauty competition मध्ये भाग घेतलास तर पहिली तूच येशील, खरच तू खूप सुंदर दिसतेस”

“बर ते जाऊदे, पार्टीचे decoration भारी केलंयस! ”

“ओह, थँक्स”

“आणि तुला एक सांगायचंय तुझा मित्र आहे ना तो गरीब राहुल, तो इथे वेटर बनून आलाय”

“हो का! ”दिशा चिंतेच्या स्वरात बोलली

“बर तू मला काल बोललेलास, की तुला उद्या surprise देणार, काय आहे surprise??”

“हो सांगतो, जरा सबर कर, सबर का फल मिठा होता हे! ”

पार्टीला सर्वप्रथम सगळ्यांनी डांस केला. तिथे bear ची पण सोय होती.

“दिशा इकडे ये ना! ”

“का रे”दिशा ओमकार जवळ येत म्हणाली

“ही घे bear पी”

“नाही नको, मी नाही कधी पिली”

“अग पी खूप भारी असते. ”

दिशा एकच घोट घेते

“श…किती खराब लागतेय, तुम्हाला कशी आवडते ही! ”दिशा उलटी करत बोलली

“थांब तुझ्यासाठी cold drinks मागवतो, वेटर इकडे ए cold drinks दे”

दिशाने पाहिले तर तो वेटर दुसरा कोणी नसून राहुलच होता

वेटरने म्हणजे राहुलने दिशाकडे पाहिले त्यातच त्याचा धक्का लागला व त्या trey मधील cold drinks दिशाच्या गाऊन वर सांडले.

“Are you mad, तुला कळत का तू काय केलयस ते??”, ओमकार रागात राहुलला म्हणाला

“जाऊदे ओमकार मी पुसते डाग”

“पण ह्याची लायकी आहे का तुझ्या अंगावर cold rings सांडण्याची”

“Sorry दिशा”, राहुल खाली मान घालून बोलला

“कोण दिशा मॅडम म्हण, तू इथे नोकर आहेस आणि नोकरासारखाच रहा”, ओमकार परत आवाज चढवुन बोलला

ओमकार राहुलला कानफटात देणार तेवढ्यात दिशाने त्याला खेचले व ती ओंकारला तिथुन घेऊन गेली.

“दिशा तू मला खेचलेस का! ”, राहुल अजूनही रागातच होता

“असुदे रे, मी जाते वॉशरूमला तू थांब येथे”

दिशा वॉशरूममध्ये गेली आणि ओमकार तिची वाट बघत रुमच्या बाहेरच थांबला.

तेवढ्यात ओमकारचा सुरेश नावाचा मित्र तेथे आला आणि म्हणाला

“ओमकार तुला एक विचारू का! ??”

“हो विचार ना”

“तुझी पहिली मैत्रीण अनिताच काय झाले??, तू तिच्यावर प्रेम करत होतास ना! ”

“प्रेम आणि मी, मी फक्त स्वतःवर प्रेम करतो बाकी कोणावर करत नाही

“दिशावर पण नाही! ”

“नो, पहिला अनिताचा वापर केला आणि आता दिशाचा, एकदा का आपले काम झाले की मग नंबर डिलिट करायचा आणि तिला आयुष्यातून ब्लॉक करायचं आणि नवीन शोधायची”ओमकार इकडे-तिकडे बघत म्हणाला

तेवढ्यात तिथे दिशा आली. दिशाने सगळे ऐकलेले होते, तिच्या डोळयातून टपकन पाणी आले

"ओमकार म्हणाला, दिशा तू ऐकलस सगळे"

"तू माझ्याबर बोलूच नकोस, तू माझा फक्त use करत होतास आणि इथे मी तुझ्यावर जीवापाड प्रेम करत होते"

"नाही तसे काही नाही मीपण तुझ्यावर प्रेम करतो, ", ओमकार डोक्यावरून हात फिरवून बोलला

"सगळे खोटे, तुम्ही सगळी मुले अशीच असतात, नुसतं आमच्यावर खोटे प्रेम करता, आमचा use करता आणि नंतर सोडून देता, तुम्हाला मुली म्हणजे काय वस्तू वाटते होय, use and throw", दिशा रागातच म्हणाली पण तिच्या डोळयातून अश्रूचे पाट वाहत होते

"अग सगळी माणसे बघतायत तू माझी इज्जत काढतेस! "

"म्हणजे तुला माणसांची फिकर, माझी काहीच फिकर नाही, हो आणि मी कोणाकडून फिकरची अपेक्षा करते जो स्वतः सोडून कोणावरच प्रेम करत नाही"

"ए बास झालं जा! मगाचपासून ऐकून घेतोय, तू काय स्वतःला खूप स्मार्ट समजतेस??"

"नाही मी नाही, तू स्वतःला स्मार्ट समजतोयस"

"ऐ बास झालं, तुझी लायकी आहे का माझ्या पार्टीत येऊन माझी बदनामी करायची"

दिशाने सनकन ओमकारच्या कानफाटात मारली आणि डोळे पुसत तिथून बाहेर गेली.

दिशा पार्टीच्या बाहेर असलेल्या रस्त्याच्या कडेला रडत बसलेली होती, तितक्यात तिथे राहुल आला.

“दिशा कोणत्या विचारात गुंगलेस??”

“राहुल मला एकटे सोड, जा तू आपले तुझे काम कर”, दिशाने राहुलला बाजूला ढकलले

“असल्या कठीण परिस्थितीत जवळ नसेल तर तो मित्र कसला!”

“राहुल जा खरच जा तू, मला एकटे राहुदेत आणि तू पण त्या ओमकारसारखाच नुसते पहिल्यांदा गोड गोड बोलायचे आणि काम झाल्यावर सोडून द्यायचे, तुम्हाला मी काय त्यातली मुलगी वाटते होय, जा तू! ”

“बर मी जातो, तू तुझी काळजी घे. ”

दिशा खूप नाराज होती, तिला एकावेळी वाटले की संपवावे सगळे पण तिला तिच्यापुढे आईबाबांचा फोटो दिसला व तिने स्वतःला सावरले.

## निकालाचा दिवस

आज पहिल्या सेमिस्टरचा निकाल होता. दिशा अजूनही त्या घटनेतून बाहेर पडलेली नव्हती; पण तिने ह्याबाबत घरात काहीही सांगितलेले नव्हते.

दिशा उठली व कॉलेजला गेली. निकाल घ्यायला खूपच गर्दी होती, ती निकाल बघते तर तिचे दोन विषय गेलेले, त्यातील एक विषय म्हणजे Analytic chemistry

दिशाला कसेतरीच वाटले पण तिच्या चुकीमुळेच तिचे दोन विषय गेलेले. तिच्या मनात विचार आला की; ओमकार आपल्या आयुष्यात आलाच नसता तर आपण पण लेक्टर बुडवली नसती, आपलेही सगळे विषय आले असते; पण तो आयुष्यात आल्यामुळे कोणावरच विश्वास ठेवायचा नाही हे तरी कळले!

तेवढ्यात तिथे राहुल आला, तो खूप आनंदात होता

"Hi दिशा, किती मार्क्स पडले??", त्याने खुशीने विचारले

"माझे दोन विषय राहिले, तुझे"??, दिशा नाराज होऊन बोलली

"मी पास झालो विथ फर्स्ट क्लास"

"अभिनंदन आणि सॉरी"

"सॉरी का! "

“अरे त्यादिवशी मी तुला खूपच वाईट बोलले त्यासाठी सॉरी, मी ओमकारचा सगळा राग तुझ्यावर काढला”

“तुझे पण खरे होते, आताची मुले time pass म्हणूनच प्रेम करतात, पण सगळीच मुले तशी नसतात”

“हो, मला तू त्यातला वाटत नाहीस”

“मी नाहीच त्यातला; पण असे कोणावर लवकर विश्वास ठेवू नकोस, हे कलियुग आहे, इथे कोण धोका देईल सांगता येत नाही. ”

“मी आता आई बाबा सोडून कोणावरच विश्वास ठेवत नाही, हो पण त्यादिवशी तू वेटर का होतास त्या पार्टीत??”

“अग आपल्याला सुट्टी होती ना म्हणून मी घरात मदत म्हणून कामाला गेलेलो हॉटेल मध्ये आणि त्या ओमकारने सर्व नियोजन आमच्या हॉटेल मध्येच केलेले. ”

“पण तुला लाज नाही वाटली, सगळे आपल्या age ची मुले एन्जॉय करतात आणि तू तिथे वेटर”

“त्यात लाज कसली??, ते म्हणतात ना गरिबीला लाजू नये आणि श्रीमंत झाल्यावर माजू नये”

“हे मात्र खरे आहे”

“ते जाऊदे, तू आता मन लावून अभ्यास कर आणि पुढच्यावेळी पास हो; कारण आपले फर्स्ट इयरचे सर्व विषय क्लिअर असल्याशिवाय आपल्याला सेकंड इयरमध्ये ॲडमिशन नाही घेता येत”

“हो खरच, मला खूप टेन्शन आलंय, मी हे घरी नाही सांगणार की; माझे दोन विषय गेलेत ते. ”

“टेन्शन नको घेऊ, मी केलेत लेक्चर, मी तुला नोट्स देईन फर्स्ट सेमच्या”

“हो थेंक्स, तुझ्याकडे मोबाईल आहे का! ”दिशा म्हणाली

“हो आहे ना पण साधा नोकियाचा”राहुल हसतच म्हणाला

“मला तुझा नंबर मिळेल का! ”

“हो मिळेल ना, हा घे माझा नंबर 92######99, पण माझ्यात व्हाट्स अँप वगैरे काही नाही”

“हो रे, मी तुला कॉल करत जाईन वेळ भेटेल तेव्हा”

“बर मी जातो, तू अभ्यासावर फोकस कर”राहुल म्हणाला

“चालेल, परत एकदा अभिनंदन”

“मला आई-बाबांना ही न्युज द्यायची आहे, ते खूप खुश होतील, मला माझ्या आईबाबांना खूप खुश ठेवायचंय”

दिशा घरी गेली, तिला खूप वाईट वाटले व आता तिने ठरवले की; आपण सेकंड सेममध्ये एकपण लेक्टर मिस नाही करायचं आणि मनलावून अभ्यास करायचा.

दिशा न जेवताच आपल्या रूममध्ये गेली, तिच्यामागून लगेच तिचे बाबाही रूममध्ये आले

बाबा म्हणाले, ”काय झाले बेटा??”

“काही नाही बाबा, जरास डोक दुखतंय”

“खरे सांग, काही टेन्शन नाही ना…”

“नाही बाबा, तुम्ही जा, विश्रांती घेतल्यावर वाटेल बरे”

बाबा बाहेर आले आणि आईला म्हणाले, “अग बायको दिशाचा वाढदिवस जवळ आलाय, मी पैसेही जमा केलेत आपण तिच्यासाठी scooty घेऊया”

“हो खूप चांगली आयडिया आहे, दिशाही खूप खुश होईल. ”

“आता मी तुझ्यासाठी पण सोन्याचा दागिना करणार, जेणेकरून तू दिशाच्या लग्नात दागिना घालून मिरवशील”

“त्याची काही गरज नाही, अजून आपल्याला दिशाच्या लग्नासाठी पैसे जमा करायचे आहेत, आणि मला जास्त आवडही नाही सोन्याचा दागिना घालण्याची”, दिशाची आई म्हणाली.

“करू ग, दिशाचे डोके दुखतंय, तू सूप करून दे तिला, मी जातो झोपायला. ”

## दिशाचा बर्थडे..

आज दिशा 22 वर्षाची झाली. ती सकाळी लवकर उठली व अंघोळ वगैरे करून प्रथम देवाच्या पाया पडली आणि नंतर आई-बाबांच्याही पाया पडली.

“सुखी रहा बेटा”, आई बाबा दोघेही सोबत म्हणाले

“आणि हो तुला आज आम्ही surprise देणार आहोत संध्याकाळी”

दिशाला surprise म्हणले की; तो ओमकारचा इनसिडेंट आठवला व ती परत नाराज झाली.

“काय झाले बेटा, तू खुश नाहीस”बाबा म्हणाले

“हो बाबा आहे ना खुश”

“दिशु तू आयुष्यात खूप पुढे जावेस असे आम्हाला वाटते! ”

“हो बाबा मी खूप मोठी होणार आणि तुमचे नाव मोठे करणार”

दिशा आपले आवरून कॉलेजला गेली.

दिशा कॉलेजमध्ये रेड ड्रेस घालून गेलेली, त्यात ती खूपच सुंदर दिसत होती.

“दिशा आज काय special आहे का??”, राहुलने विचारले

“अरे आज माझा बडे आहे”

“Oh, wish you Many Happy returns of the day”, राहुल बोलला

“Happy Birthday disha”, रुपालीनेही विष केले

“थँक्स राहुल आणि रुपाली”

ते सर्वजण तिथे बसलेले होते लेक्टरची वाट बघत, तेवढ्यात दिशाने मोबाइल उघडला व बघितले की कोणी कोणी विष केलय ते

तिला प्रथमच unknown नंबर ने Happy Birthday विष केलेलं दिसले

तिने Type केले, “कोण तुम्ही??”

“मी ओमकार”, समोरून रिप्लाय आला

“तुला सांगितलंय ना की माझ्या संपर्कात राहू नकोस, मी तुला तू करतोस तस आयुष्यातून ब्लॉक केलंय”

“सॉरी, मला माफ कर, मला माझी चूक कळलेय! ”

“ते कधीच होऊ शकत नाही”तिने ओमकारचा नंबर ब्लॉक केला आणि ते सर्व चॅटस delete केले, तेवढ्यात तिला अनिताचा कॉल आला

“Hi दिशा”

“Hi बोल ना”

“Wish You many happy returns of the day”

“Thank you”

“काय मग बडे special??”

“काही नाही लेक्टरसाठी थांबलेय, आणि तू येत का नाहीस कॉलेजला??”

“नाही अग माझ्या पप्पांची बदली झालेय मुंबईला, त्यामुळे आता इथेच आलोय आम्ही सगळे”

“आणि कॉलेज??”

“सोडले कॉलेज, आता इथेच कोर्स करतेय नेटवर्किंगचा, बर ते जाऊदे मला त्यादिवशीचा विषय कळला तुझा आणि ओमकारचा

“तो खूप वाईट माणूस आहे”दिशा म्हणाली

“हो ना, तुला एक सांगू का??”अनिताने विचारले

“हो सांग ना”

“कोणाला सांगू नकोस! ”

“नाही सांगत”

“ओंकारने मलाही फसवले, माझा ही use करून घेतला आणि नंतर मलाही सोडुन दिले”, अनिता रडव्या स्वरात बोलली

“ओह, त्यादिवशी मला कळले, किती निर्लज्य मनुष्य आहे ओमकार, आता त्याने मला बडे विषकरायला मेसेज केलेला”

“मग तू काय केलंस??”

“मी त्याचा नंबर delete केला आणि त्याला ब्लॉक ही केले”

“चांगल केलेस, बर बाय, परत करेन कधीतरी वेळ भेटला की”अनिता बोलली

“Ok बाय माझे पण लेक्टर आहे”

दिशाचे कॉलेज सुटल्यावर ती आणि राहुल एकत्रच होते, “बर बाय राहुल मी जाते रिक्षाने”दिशा मोबाईल पर्समध्ये ठेवत बोलली

“नको थांब, आज आपण चालत जाऊया तुला एक surprise द्यायचं आहे”

दिशा रागात म्हणाली, ”surprise म्हणले की डोके फिरते माझे”

“तुझा माझ्यावर विश्वास असेल तरच चल; नाहीतर जा तुझी तू रिक्षाने”

“विश्वास आहे रे चल जाऊया पण लवकर, मला बाबापण काहीतरी surprise देणार आहेत”

“ते पहिल्यांदा बेकरीमध्ये गेले, तिथे राहुलने केक आणि chocolates घेतले”

दिशा म्हणाली, ”अरे chocolates कशासाठी??”

“चल तुला समजेल”

“अरे पण इतके पैसे आले कुठून??”

“हो तुझ्या सर्व प्रश्नांची देतो उत्तर, चल तू आधी चल”

ते दोघे अनाथाश्रमात गेले. आत गेल्यावर तिथे खेळत असणारी अनाथ मुले राहुल दादा करत राहुलपाशी आली.

त्यातील एक म्हणाला, ”राहुल दादा आज काय आणलंय खायला??”

दुसरा बोलला, “आणि ह्या कोण आहेत??”

राहुल एकाच्या डोक्यावरून हात फिरवत बोलला, “ही तुमची मोठी ताई आणि आज हिचा जन्मदिवस आहे, म्हणून आम्ही इथे आलो आहोत”

सर्वजण एकसोबत म्हणाले, “वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ताई”

दिशा अजूनही विचारातच होती

राहुल म्हणाला, ”काय झाले दिशा कोणत्या विचारात आहेस??”

“नाही नाही ह्या मुलांना बघून खूप भारी वाटले”दिशा हसत म्हणाली

“बर चल आपण केक कापुया”,

सगळी मुले ओरडायला लागली, हे पाहून दिशाला खूप भारी वाटले, तिने असा वाढदिवस कधीच साजरा केलेला नव्हता

“Happy birthday दिशा”, राहुल केकवरचे कव्हर उघडत म्हणाला

दिशाने केक कापला, तिथली सगळी मुले ओरडत होती, ”happy Birthday Tai”

दिशाने सर्व मुलांना केक भरवला व शेवटी राहुलाही केक भरवला, दिशाला आता राहुलबद्दल मनात काहीतरी वाटत होते.

राहुल आपला मुलांबर खेळत होता, दिशा ते दुरून पाहत होती, तितक्यात तेथे त्या अनाथाश्रम मधल्या बाई आल्या आणि दिशाला म्हणाल्या

“तू राहुलची कोण ग??”

“मी राहुलची मैत्रीण, तुम्ही इथल्या बाई आहात का! ”

“हो, राहुल खूप चांगला व्यक्ती आहे, तो दर महिन्यात एकदा तर इथे भेट देतो व या अनाथ मुलांना सहारा देतो. राहुल आल्यानंतर खूप खुश होतात सगळी मुले”

दिशाच्या मनात विचार आला की; राहुल इतका गरीब असून, तो चालत कॉलेजला यायचा आणि तो दर महिन्याला इथे यायचा, तिने

राहुलकडे बघितले तो त्या मुलांबर खेळत होता, दिशाला एकदमच हसू फुटले.

तिथून गेल्यानंतर दिशाने राहुलला विचारले, ”राहुल तुला एक विचारू का??”

“मला माहित आहे तू काय विचारणार आहेस ते, माझ्याकडे एवढे पैसे कुठून आले??, अग मला बाबा दररोज रिक्षाचे पैसे द्यायचे, मी ते पैसे जपून ठेवायचो आणि ह्या मुलांना प्रत्येक महिन्यातल्या एका दिवशी येऊन गिफ्ट द्यायचो आणि ओमकारच्या पार्टीत वेटर झालेलो ते पण ह्याच कारणासाठी”

दिशा घरी पोहोचल्यावर तिला राहुलबद्दल खूप आपुलकी वाटली, तिला ते आश्रमातील क्षण आठवले, आजचा दिवस तिच्या आयुष्यातील सर्वात चांगला दिवस होता. तिला आता राहुलबद्दल मनात प्रेमही वाटत होते पण ओमकारच्या घटनेमुळे तिने तो विचार मनातून काढला.

तेवढयात बाबांनी बाहेरून हाक मारली, “ऐ दिशु बाहेर ए, हे बघ मी तुझ्यासाठी काय आणलंय??”

दिशा उत्सुकतेने बाहेर गेली तर तिला बाहेर नवीन scooty दिसली, ती खूपच खुश झाली, कारण तिला खूप दिवसांपासून scooty हवी होती.

“बाबा थँक्स, किती मस्त आहे ही scooty”हे बोलून दिशा बाबांना भेटली

“आवडली तुला बेटा”, बाबांनी खुश होऊन विचारले

“हो बाबा, खरच खूप मस्त आहे, मी राऊंड मारून येऊ का एक??”

“हो जाना तुझीच आहे ती, त्यात विचारायचे काय??, पण पाहिल्यांदा देवळात जा”

“हो बाबा, मी पहिल्यांदा देवळात जाते”दिशा बाबांकडून scooty ची चावी घेत म्हणाली

“होम मिनिस्टर आज गोडधोडाच करा”बाबा आईची थट्टा करत म्हणाले

“हो कळले, पण आपण बाहेर आहोत, नीट बोलाना माणसे ऐकतायेत”

“एकुदे की मग, मी कोणाला घाबरतो होय”

दिशाच्या फायनल पेपरला आता फक्त एक आठवडाच शिल्लक राहिलेला होता, तिची आणि राहुलची आता घट्ट मैत्री झालेली होती. दिशाने ह्यावेळी एक लेक्टरपण मिस केले नाही. ती प्रत्येक लेक्टरला जाऊन बसायची आणि राहुलने तिला मागच्या सेमच्या important

नोट्सही दिलेल्या होत्या, दिशा आता मन लावून अभ्यास करायची. तिने मागच्या महिन्यापासूनच अभ्यासाला सुरवात केलेली होती.

बघता बघता दिशाचे पेपर संपले, तिला सर्व पेपर खूप सोपे गेलेले, आता ती फक्त result ची वाट बघत होती आणि तिला आता कळून चुकले की राहुलच आपल्यासाठी परफेक्ट मुलगा आहे, राहुलला पण पेपर खूप सोपे गेलेले.

दिशाने राहुलला कॉल केला, ''Hi राहुल''

“Hi दिशा, तुला परत कॉल करू का मी जरा कामात आहे??”

“एवढा काय busy आहेस, तुला माझ्याबर बोलायलाही वेळ नाही होय”

“मी सुट्टीत कामाला जातो ते तुला माहीतच आहे, मग त्याच कामाला आलोय, संध्याकाळी घरी गेल्यानंतर फोन करेन”

दिशाच्या आयुष्यातील turning point..

“Hi राहुल, मला खूप टेन्शन आलंय आज निकालाचा दिवस आहे ना! ”

टेन्शन नको घेऊस, आपण दोघेही पास होणार, मेहनत घेतल्यावर त्याचे फळ नक्की मिळते”

“हो ते तर आहेच, मी आता निघते कॉलेजला यायला, तू पण निघ. ”

“हो भेटू कॉलेजवर”

दिशा आणि राहुल सोबतच निकाल घ्यायला गेले, त्यांना तिथे Analytic chemistry च्या गायकवाड मॅडम दिसल्या आणि त्याच सर्वांना निकाल वाटत होत्या.

राहुल म्हणाला, ”May I coming madam”

मॅडम म्हणाल्या, ”yes coming आणि ही पण आली होय निकाल घ्यायला”

दिशा घाबरतच आत गेली, तिने निकाल बघितला, तर तिचा analytic chemistry हा विषय गेलेला होता, तिला पहिल्यांदा काही सुचलेच नाही, तिला वाटले की आपण एवढी मेहनत घेतली पण त्याचे फळ काय fail!

मॅडम म्हणाली, “सॉरी दिशा तुला आता परत फर्स्ट इयर मध्ये बसावे लागणार, पुढच्यावेळी चांगला अभ्यास कर ऑल द वेरी बेस्ट”

दिशाला काही सुचलचं नाही, राहुलचा क्लासमध्ये प्रथम क्रमांक आलेला होता.

“दिशा जाऊदे तू पुढच्या वेळीस चांगला अभ्यास कर”

“अरे राहुल, पण खूप मनलावून अभ्यास केलेला यार तरी fail, मला ह्या मॅडमनेच fail केलंय मुद्दामूण”दिशा रडव्या आवाजात म्हणाली

“जाऊदे त्या म्हणाल्या ना, पुढच्या वेळी चांगला अभ्यास कर म्हणून. ”

“नाही मी नाही घेणार admission, बास शिक्षण”

“अस नको करू यार, शिक्षण खूप महत्त्वाचे आहे. ”

“नाही मी नाही शिकणार आता बास graduation पर्यंत शिक्षण, ते जाऊदे कॉंग्रेट्स यार तू क्लास मध्ये पहिला आलास, तू खूप अभ्यास कर आणि मोठा माणूस हो”

“थँक्स पण तू जरा ह्यावर विचार कर, मी जातो घरातल्यांना ही खुशखबरी द्यायची आहे”

दिशा घरी गेली तर बाबा आज लवकरच घरी आलेले, बाबांना पाहून दिशा खूपच घाबरली

“बेटा काय झालं किती पडली मार्क्स??”, बाबा म्हणाले

आई बोलली, ”मला माहीत आहे की तू पास होणार, म्हणून मी तुझ्यासाठी खीर केलेली आहे”

दिशा अजून गप्पच होती

“दिशा तू गप्प का आहेस, तू नापास तर नाही झालीस ना! ”, बाबा जरा रागातच बोलले

दिशाने खाली बघत मान हलवली

“काय तू नापास झालीस, काय स्वप्न बघितलेली तुला खूप शिकवायचे??, स्वतःच्या पायावर मोठे करायचे, पण तू त्या सगळ्या अपेक्षा भंग केल्यास”

“नाही बाबा मला नाही शिकायचे, मला नाही आवडत शिकायला”, दिशा रडतच म्हणाली

“आता तुझे परत admission करायला पैसेही नाहीत आपल्याकडे, आता तुझे लग्न, मी बघितलेत दोन-तीन स्थळे, आता कर लग्न”

“नाही बाबा, मला नाही करायचे लग्न”दिशा डोळे पुसत बोलली, तिचे डोळे लाल झालेले.

“अहो कशाला तिच्यावर दबाब टाकताय??”, आई मधेच बोलली

“नाही दबाब टाकत नाही पण आता लग्न”

दिशाने डोळे पुसले व आपल्या रूम मध्ये गेली.

बाबा तीन दिवसानंतर दिशाच्या रूममध्ये येऊन दिशाला म्हणाले, “दिशा तुला उद्या मुलगा बघायला येणार आहे, खूप चांगले स्थळ आहे, मुलगा मुंबईमध्ये कामाला आहे 30000 पगारवर. ”

“नाही बाबा मला नाही करायचं लग्न”दिशाच्या डोळयात परत पाणी आले

“उद्या मुलगा येतोय तुला बघायला आणि तो जर पसंद आला तर त्याच्याबरच लग्न करायचे, मी एकदा बोललो की बोललो”

“बाबा मी जीव देईन, मला नाही लग्न करायचं”, दिशाच्या डोळ्यातून अश्रूचे पाट वाहत होते

“काय म्हणालीस??, तुला ह्यासाठी आम्ही मोठे केलंय”, बाबा दिशाला कानफटात देत म्हणाले

“बाबा मी घर सोडून जाईन”, दिशा गालावरून हात फिरवत म्हणाली

“बघूया कशी जातेस घर सोडून, उद्या मुलगा बघायला येणार आहे, पसंद पडला तर त्याच्याबर लग्न करायचं आणि जर घर सोडून गेलीस तर परत घरी नाही यायचं”, हे बोलल्यानंतर बाबांच्या डोळ्यातही पाणी आले

दिशा रागातच घराच्या बाहेर पडली, तिला स्वतःचा खूपच राग येत होता, तिला वाटले की जीवन संपवावे, पण तिने स्वतःला सावरले व राहुलला फोन केला,

”राहुल कुठे आहेस??”

“का ग काय काम आहे का??”

“तू मला आताच्या आता भेट, अन जर नाही भेटलास तर मी तुला परत कधीच भेटणार नाही”

“पण कुठे भेटायचं??, तू अजून त्या निकालाचे टेन्शन घेतलंयस”

“तुला मी पत्ता सेंड करते तिथे य, मी तुला सर्व सांगते. ”

राहुल तिथे अर्ध्या तासात पोहोचला

“काग काय झाल??, मला खूप काळजी लागलेय, काय टेन्शन तर नाही ना??! , राहुल घाम पुसत म्हणाला

“बस तुला सांगते सगळे”

दिशाने राहुलला सगळे सांगितले

राहुल म्हणाला, ”खूप वाईट झालं यार, आता काय करणार तू??”

“तुला एक सांगू”, दिशा राहुलच्या डोळ्यात डोळे घालून म्हणाली

“हो सांग ना! ”

“मला तू खूप आवडतोस. Will you marry me??”

राहुलला पहिल्यांदा आनंद वाटला, तो बोलला, “मला पण तू आवडतेस, पण आपण लग्न करू शकत नाही”

“का??”

“कारण आता माझी तेवढी लायकी नाही की मी एका मुलीची जबाबदारी घेऊ शकेल”

“तू मनाने खूप चांगला व्यक्ती आहेस आणि माझ्यासाठी पण परफेक्ट आहेस”

“मनाने चांगलं असणे म्हणजे झाले होय, जरा emotional विचार करायचा सोडुन practical विचार कर, मन चांगले असले म्हणून काय आपल्याला चांगले मन खायला अन्न देणार आहे होय??”

“आपण दोघे कमवू ना”, दिशा बोलली

“जेव्हा मी चांगला सेटल होईल ना तेव्हा आपण नक्की लग्न करूया आणि माझ्याबर लग्न करून तू काय भांडी घासणार आहेस. प्रेम म्हणजे सर्व नसते दिशा।ठीक आहे आपण लग्न केले, कसतरी आपण सगळे manage ही केले आणि नंतर श्रीमंत व्हायची स्वप्न काय आपल्या मुलांकडून बघायची होय. Life is opportunity to build your own empire. हे तुला जरा फिल्मी वाटत असेल पण खर आहे, आपण ह्या पृथ्वीवर एकदाच आलोय, त्यातही आपण सर्व अपेक्षा दुसऱ्यांकडून ठेवायच्या, तू आता परत MSc ला ॲडमिशन घे; नाहीतर मग Mpsc, Upsc मधील काहीतरी कर आणि तुझी वेगळी स्वतःची ओळख निर्माण कर. ”

“हे मला पटतंय रे पण आता बाबांनी मला बाहेर काढलंय, मी कुठे जाऊ??”

“चल माझ्याबर आमच्याघरी तुला कळेल आमच्यासारख्या गरिबांची अवस्था काय असते??”

“हो पण तुझ्या घरचे काय म्हणतील??”

“काही नाही मी सांगेन सगळं”

दिशा आणि राहुल राहुलच्या घरी गेले.

राहुलची आई राहुलकडे बघत म्हणाली, ”राहुल कोण आहे रे ही??”

“ही माझी मैत्रीण, पण जर मी श्रीमंत झालो तर तुझी सून”

राहुलच्या आईने दिशाच्या कपाळावर हात फिरवला आणि म्हणाली, ”किती गोड दिसतेस ग, तुला नजर नको लागायला कुणाची??”

दिशाचे लक्ष्य मात्र तिथल्या वस्तीवर होते, ते पाहून तिला उलटी आली.

राहुल म्हणाला”आई पाणी आण”

“दिशा काय झाले ग??, वस्तीतील घाण बघून उलटी आली की काय??”

दिशा पाणी पीत म्हणाली, ”हो”

“आणि इथे तू माझ्याबर संसाराची स्वप्ने बघत होतीस होय, तू जा आपली तुझ्या घरी, बाबांची माफी माग, ते तुला माफ करतील”

“नाही राहुल मी कोणीतरी बनल्याशिवाय घरी नाही जाणार”

राहुल तिच्याकडे बघून हसला.

दिशाची आई दिशाच्या बाबांना म्हणाली, “अहो, एका ना दिशाला जाऊन 5 दिवस झालेत, कुठे गेली असेल माझी लेक??”

“तिला आपली पर्वा नाहीतर आपण का तिझी पर्वा करायची??”, बाबा रागात म्हणाले

“अहो पण ती आपली एकुलती एक लेक आहे, कमी मार्क्स पडले म्हणून काय तिला घरातून हाकलून द्यायचे??”

“कोणी तिला हकलले नाही, ती स्वतःच्या मर्जीने गेलीय आणि जर तुला तिचा पुळका येत असेल तर तू पण जा घर सोडून”

दिशाची आई रडायला लागली आणि आपल्या कामात व्यस्त झाली.

आई गेल्यानंतर बाबांच्याही डोळ्यात पाणी आले, त्यांनाही दिशाची आठवण यायची.

4-5 दिवसांनंतर राहुल दिशा दिशा करत घरी आला, त्याच्या हातात वर्तमानपत्र होते

दिशा खाली झोपलेली होती, ती उठली आणि म्हणाली“काय झाले राहुल एवढ्या जोरात काय बोलतोयस??”

“अग ही news बघ, MPSC exam ची तारीख declared झाली, 6 महिन्यात पूर्वपरीक्षा आहे”

“मला का सांगतोयस हे सर्व”

“अग तू भर ना फॉर्म, आणि मनलावून अभ्यास कर”

“मला जमणार आहे होय MPSC”, दिशा म्हणाली

“तुला काहीतरी मोठे व्हायचे आहे ना, मग ही एक संधी आहे आणि तू तुझ्या घरातल्यांना दाखवच मोठी होऊन. मी आहे ना आपण तुला खूप मोठी बनवूया आणि तूझ graduation पण पूर्ण झालंय, मग भरणार ना फॉर्म??”

“हो, मी आता खूप अभ्यास करणार आणि मोठी होणार आणि आपल्याला लग्न पण करायचं आहे ना! ”

दिशाने फॉर्म भ्ररला व खूप अभ्यास केला.

पूर्वपरीक्षा आता एका हप्त्यावर आली, दिशाने खूप तयारी केलेली होती. सहा महिने तिच्यासाठी खूपच चांगले गेलेले आणि तिला राहुलने खूप साथ दिलेली या कठीण काळात. तिला कधी बाबांची आठवण आली तर तो तिला समजावून सांगायचा. दिशाने तर खूप मेहनत घेतली, आता वेळ होती परिक्षेला सामोरे जाण्याची. तिचे

पुर्वपरिक्षेचे पेपर संपले, तिला पेपर खूप सोपे गेले, आता ती मुख्य परीक्षेच्या तयारीला लागलेली होती, तिला निकालाबाबत काहीच काळजी वाटत नसे; कारण तिला माहीत होते की आपण पास होणार पूर्वपरीक्षेत.

पूर्व परीक्षेच्या निकालाचा दिवस आला, ती आणि राहुल नेट कॅफेमध्ये गेलेले निकाल बघायला.

राहुल म्हणाला, ''दिशा 5 मिनिटे राहिलेत, तू डोळे मीट मी बघतो तुझा निकाल''

दिशाने डोळे मिटले, निकालाची वेळ आली, राहुलने दिशाचा नंबर टाकला आणि जोराने ओरडलाच, ''दिशा तू पास झालीस, अभिनंदन''

दिशाने डोळे उघडले, "खर मी पास झाले, थँक्स राहुल यार"

"एवढी खुश नको होऊस, अजून मुख्य परीक्षा व्हायची आहे आणि आजपासूनच लाग तयारीला"

दिशा खुश होत म्हणाली, ''हो चल ही बातमी तुझ्या आईबाबांना देऊया''

मुख्य परीक्षा ही जवळ आली. दिशाची तयारी फुल झालेली होती, ती दिवसातून 14-14 तास अभ्यास करायची. तिची मुख्य परीक्षा पण संपली. निकाल ही लागला, त्यात दिशा पास झाली पण कमी मार्क्स ने.

आता तिला मुलाखतीत जास्तीत जास्त मार्क्स हवे होते. तिला जरा काळजीच वाटत होती; पण राहुलने तिला आधार दिला व तिच्याकडून मुलाखतीची फुल तयारी करून घेतली. बघता बघता मुलाखतीचा दिवसही जवळ आला आणि उजडलाच तो दिवस ज्याने दिशाचे भविष्य बदलणार होते. दिशाने राहुलच्या आई बाबांचे आशीर्वाद घेतले व राहुल बरोबर इंटरव्यु ला गेली.

राहुल तिची वाट बघत बाहेर थांबला, दिशा आत इंटरव्युला गेलेली होती. थोड्यावेळाने दिशा बाहेर आली, तिच्या चेहऱ्यावर चिंता दिसत होती.

राहुलने विचारले, ”काय ग काय झाले??, इंटरव्यु खराब गेला का??”

“गेलाय बरा, बघूया काय होतंय ते”दिशा स्मितहास्य करत राहुलला म्हणाली

“चल जाऊया घरी”

MPSC च्या निकालाचा दिवस उजाडला, दिशाला काल रात्री झोपच लागलेली नव्हती.

दिशा आज घरीच होती, निकाल घ्यायला राहुल एकटाच गेलेला होता

राहुल निकाल बघून घरी आला, तो कोणत्यातरी काळजीत होता, दिशाला वाटले की आपण नापास झाले वाटत

ती हळू आवाजात म्हणाली, ”नापास झाले का मी! ”

“अग वेडे तू पास झालीस आणि तुझा नंबर महाराष्ट्रात 9 वा आला आहे”

दिशाला हे शब्द एकल्यांनातर आंनदाश्रू आले. ती म्हणाली, “राहुल मला माझ्या बाबांना ही खुशखबरी द्यायची आहे”

दिशाच्या बाबांना आज सुट्टी होती, त्यांनी बातम्यांचे चॅनेल लावलेले होते आणि त्यात एक न्युज आली, ती न्युज देणारी बाई म्हणाली, “आज MPSC चा निकाल लागला आणि त्यात महाराष्ट्रात 9वा आणि मुलींमध्ये पहिला क्रमांक पटकवलेल्या 'दिशा मनोहर माने' यांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा”. दिशाच्या बाबांना काहीच सुचले नाही तेवढ्यात तिथे दिशा आली.

“बाबा मी तुमचे नाव मोठं केले, मी राज्यात 9 वी आले, तुम्हाला गर्व वाटेल असे मी करून दाखवले”, दिशा रडतच बोलली

दिशाच्या बाबांच्या डोळ्यातही पाणी आले, “बेटा ऐ इकडे, सॉरी मी तुला खूप बोललो, तुला घरातून हकलून दिले, मला माफ कर, खरच आज आम्हाला तुझा खूपच अभिमान वाटतो”. दिशा आणि बाबांनी मिठी मारली, हे दृश्य पाहून राहुलला आणि दिशाच्या आईला ही रडू आले.

## 2 वर्षांनंतर

दिशाचे ट्रेनिंग पूर्ण होऊन ती आता Dy collector झालेली, तिचे आणि राहुलचे लग्न मागच्याच महिन्यात झालेले होते, राहुलही मोठ्या कंपनीत चांगल्या नोकरीवर होता, त्यांचा आता मोठा बंगलाही होता आणि आज दिशाचा इंटरव्यु होता, MPSC चा नव्हे तर ती Dy collector झाल्यामुळे तिचा आज इंटरव्यु होता. ती इंटरव्यु ला तयार झालेली होती, ब्लू साडीमध्ये ती खूपच सुंदर दिसत होती आणि राहुलही कोट मध्ये खुलून दिसत होता. ते दोघे कॉलेजचे मित्र आता एकमेकांचे सोबती झालेले, दिशा आणि राहुल हॉलमध्ये पोहोचले. प्रथम राहुलचे भाषण होते, तो स्टेजवर गेला व म्हणाला, “खर तर माझी इथे येऊन भाषण द्यायची लायकी नाही पण आज माझ्या बायकोचा सत्कार आहे, हे तिचे यश तिच्या जिद्द, चिकाटी यांमुळे तिला भेटले. मला जास्त बोलता येत नाही व जाता जाता एकच सांगीन I Love You दिशा”

दिशा स्टेजवर भाषण करायला आली, तेथील सर्व मंडळीनी तिचे टाळयांच्या गजरात स्वागत केले.

“मी दिशा राहुल जाधव, आजचा दिवस हा फक्त मला राहुलमुळेच बघायला भेटला, तो माझ्या आयुष्यात देव बनून आला, त्याने माझे आयुष्य पूर्ण बदलले, तो जर माझ्या आयुष्यात आला नसता

तर मी आज काहीही नसते, त्याने माझे पूर्ण आयुष्यच बदलून टाकले. माझ्या आयुष्यात दोन मुले आली, त्यातील एका मुलाने माझा फक्त वापर केला आणि दुसऱ्याने जगायला शिकवले. आणि त्यातील दुसरा मुलगा म्हणजे राहुल. मी कॉलेजमधील गायकवाड मॅडमचे पण आभार मानेन की त्यांनी मला नापास केले, जर मी Analytic chemistry मध्ये फेल झाले नसते तर मी आता इथे नसतेच. आणि जाताना एकच सांगेन, प्रेम म्हणजे नुसते लग्न करणे नाही, तर सोबत येऊन काहीतरी मिळवणे, हासिल करणे आणि राहुल I love you 2, धन्यवाद. तेथील सर्व मंडळीनी दिशाचे टाळयांच्या गजरात अभिनंदन केले.

आता राहुल आणि दिशा हनिमूनला गेलेले पॅरिसला. ते दोघेही तेथील बीचवर गेले.

राहुल दिशाच्या खांद्यावर हात टाकून दिशाला म्हणाला, ”कसे वाटले??”

“तुला सांगू का राहुल, माझे स्वप्न होते की मी वर्ल्ड ट्रॅव्हलर व्हायचे. आज ते पूर्ण झाले, thank You so much and Love You”

समाप्त….

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.



मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वत:ही लिहायला हवं.

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com